पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

# २३.
# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प - पशुधन आधार सेवा (MACP)

# २३. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प - पशुधन आधार सेवा (MACP)

महाराष्ट्र शासनामार्फत पशुसंवर्धन, पणन व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हाती घेण्यात आलेल्या अनेक उपाययोजना पैकी महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) ही एक उपाययोजना आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणांचा हा एक भाग आहे. एम.ए.सी.पी प्रकल्पाचा उद्देश कृषी उत्पादकता वाढविणे, उत्पादीत मालांच्या गुणवत्तेचा दर्जा वाढविणे आणि यासाठी शेतकऱ्यांना आत्माच्या (ATMA) माध्यमातून प्रशिक्षित करणे हा आहे. शेतकऱ्याने पिकविलेल्या मालाला योग्य किंमत मिळावी यासाठी प्रचलीत बाजार सुविधांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण करण्याबरोबरच पर्यायी बाजारांच्या सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पाद्वारे पशुजन्य पदार्थांच्या विपणनामधील स्पर्धा वाढवून याद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पादनांना अधीक मूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

**पशुआधार सेवेची उद्दीष्टे -** या प्रकल्पांतर्गत मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जानावरांच्या (शेळ्या / मेंढीचे बाजार) ४ बाजाराचे बळकटीकरण प्रकल्प कालावधीत करण्यात येणार आहे. बाजारात विक्री योग्य व पुरेशा प्रमाणात पशुधन उपलब्ध होण्यासाठी पशुधन घटकांची शाश्वत व गतीमान वाढ साध्य करण्यात येणार आहे. सध्या पशुसंवर्धन खात्यामध्ये विस्तार सेवा देण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे पशुधन विस्तार सेवा कक्षेचा विस्तार करण्यांसाठी पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती नेमून साध्य करण्यांत येणार आहे. तसेच शेळी व मेंढी पालन करणारे शेतकरी असंघटित असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही. अशा असंघटित शेळी मेंढीपालन करणारे शेतकऱ्यांचे संघटन करून व त्यांचे उत्पादन गट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. पुणे शहरात आधुनिक कत्तलखाना स्थापन करणे व मटन व पशुजन्य मूल्यवर्धीत उत्पादनाची विक्री व व्यापार वाढविणे यासाठी अभ्यास करण्यांत येणार आहे. पशुसंवर्धन विभागात संगणकीय माहिती उपलब्ध होण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे जरी पशुजन्य उत्पादनात लक्षणीय वाढ होत असली तरी संगणकीय माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहितीची देवाण-घेवाण करता येत नाही. हे करण्यासाठी पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापना करण्यांत येणार आहे .

**पशुआधार सेवेचे अंमलबजावणी कार्यक्षेत्र ---** या प्रकल्पांतर्गत मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जनावरांच्या (शेळ्या / मेंढीचे बाजार) ४ बाजाराचे बळकटीकरण प्रकल्प कालावधीत करण्यात येणार आहे. या बाजारांच्या लाभक्षेत्रातून म्हणजेच १८ जिल्ह्यांतून पशुआधार सेवेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

| मोठ्या जनावराच्या बाजारांचे गाव (जिल्हा) | | शेळ्या / मेंढीचे बाजारांचे गाव (जिल्हा) |
|---|---|---|
| १) सावनेर (नागपूर) | ११) पाचोरा (जळगाव) | (१) आटपाडी (सांगली) |
| २) लाखनी (भंडारा) | १२) वडगाव पेठ (कोल्हापूर) | (२) दौंड (पुणे) |
| ३) आमगाव (गोंदिया) | १३) अंमळनेर (जळगाव ) | (३) दहीवडी (सातारा) |
| ४) चांदुर बाजार (अमरावती) | १४) शिरपूर (धुळे) | (४) कर्जत (अहमदनगर) |
| ५) करंजा (वाशिम) | १५) वसई (ठाणे) | |
| ६) पुसद (यवतमाळ) | १६) खेड (पुणे) | |
| ७) मेहकर (बुलढाणा) | १७) लोणंद (सातारा) | |
| ८) कडा (बीड) | १८) सांगोला (सोलापूर) | |
| ९) पिंपळगाव बसवंत (नाशिक) | १९) अकलूज (सोलापूर) | |
| १०) नेवासा (अहमदनगर) | २०) सांगली (सांगली) | |

**जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पातंर्गत पशुधन आधार सेवा या पशुसंवर्धन विभागाचे मंजूर घटक/घटकांसाठीचा उपलब्ध निधी.** (रुपये लाखात)

| | |
|---|---|
| • पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापना करणे | ५२०.०० |
| • ग्राम पशुसंवर्धन विस्तार संघ पशुसंवर्धन विस्तार महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती | १००.०० |
| • पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळी/मेंढी पालकांना शेतकऱ्यांना आधार देणे व शेळ्या/मेंढ्यांची संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे. | ७२.२० |
| • पुणे शहरातील मटण बाजाराचा अभ्यास करणे | ------ |
| • बीड व यवतमाळ जिल्ह्यातून शेळी पालन एक उच्चमूल्यवर्धीत व्यवसाय यांची प्रात्यक्षिके राबविणे | ११४.४० |
| • जनावरांची आरोग्य तपासणी शिबीरे | ४४६.४० |
| • पुणे येथील राज्यस्तरीय पशुसंवर्धन प्रशिक्षण संस्थेचे बळकटीकरण करणे | २७.०० |
| **एकूण** | **१२८०.००** |

**जागतिक बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पातंर्गत आत्मामार्फत पशुधन आधार सेवा या पशुसंवर्धन विभागाचे मंजूर प्रशिक्षण/अभ्यास दौरे/प्रात्यक्षिके साठीचा उपलब्ध निधी**

| **प्रशिक्षण** | | **(रुपये लाखात)** |
|---|---|---|
| • पुरवणी बाजार धोरणाची तयारी, धोरणात्मक संशोधन व विस्तार आराखडा अंतर्गत पशुसंवर्धन अधिकाऱ्याचे प्रशिक्षण | - | ५१.०० |
| • पशुसंवर्धन खात्यातील क्षेत्रीय विस्तार अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण | - | ३२.४० |
| • बीड व यवतमाळ येथील प्रात्यक्षिक शेळी पालक लाभार्थ्यांना प्रशिक्षण | - | ०६.५० |
| • शेतकरी गटासाठी बाजार मूल्यवर्धित तांत्रिक प्रशिक्षण | - | १३.०० |
| **अभ्यास दौरे** | | |
| • राज्याअंतर्गत शेतकरी अभ्यास दौरे | - | ०९.०० |
| • राज्याबाहेर शेतकरी अभ्यास दौरे | - | १८.०० |
| **प्रात्यक्षिके** | | |
| • प्राणी कल्याण शिबीरे / पशुधन व्यवस्थापन प्रात्यक्षिके | - | ५२.५० |
| • चारा उत्पादन प्रात्यक्षिके | | १७५.०० |
| **एकूण** | - | **३५७.४०** |

**ग्राम पशुसंवर्धन विस्तार संघ- पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती :-**

- ग्रामपातळीवरील महिला ग्राम विस्तार कार्यकर्ती प्रकल्प कालावधीत एकूण २५०० कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. प्रकल्प कालावधीत मोठ्या जनावरांचे वीस बाजार व लहान जनावरांच्या चार बाजाराच्या लाभ क्षेत्रातून सदर कार्यकर्त्यांची नेमणूक प्रति पाच गावाच्या ग्राम समुहातून एका कार्यकर्तीची काही निकषावर निवड करण्यात येईल. सात दिवसाचे ग्राम पातळीवर पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणात तंत्रज्ञान विकास, जंतनाशके पाजणे, पशुसंवर्धन व्यवस्थापन, लसीकरण इत्यादीचा समावेश असेल. कार्यकर्तींना लस पेटीका, संदेशवाहन साहित्य, अनुषंगिक साहित्य पुरवठा करण्यात येईल या कार्यकर्त्यांमार्फत देण्यात येणाऱ्या पशुसेवा सशुल्क असल्यामुळे त्या स्वयंपूर्ण होतील.

**पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळी / मेंढी पालकांना / शेतकऱ्यांना आधार देणे व शेळया / मेंढ्यांची संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे :-**

- पुणे, सातारा, सांगली व अहमदनगर जिल्ह्यात शेळ्यांची संख्या जास्त असल्यामुळे या जिल्ह्यांची निवड केली आहे. योजनेची अंमलबजावणी सेवादाते, पशुसंवर्धन खाते व आत्मा यांचेमार्फत केले जाईल. प्रत्येक जिल्ह्यात १५० साधारण स्वारस्य गटाची स्थापना करण्यात येईल. प्रत्येक साधारण स्वारस्य गटात शेळी / मेंढीधारक १५ शेतकऱ्यांचा समावेश असेल. साधारण स्वारस्य गटांची स्थापना, क्षमता बांधणी सेवादातेमार्फत करण्यात येईल. साधारण स्वारस्य गटातून शेळी / मेंढी उत्पादक संघ / उत्पादक संघटनेची

नोंदणी करण्यात येईल. शेळी / मेंढी उत्पादक संघ / उत्पादक संघटनेची जोडणी बळकटीकरणासाठी निवडलेल्या शेळी / मेंढीच्या बाजाराशी करण्यात येईल. प्रकल्प कालावधीत एकूण ४ जिल्ह्यातून ६०० साधारण स्वारस्य गट चार शेळी / मेंढी उत्पादक संघ / संघटना व ९००० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल.

**पुणे शहरातील मटण व्यापाराचा अभ्यास करणे :-**

- पुणे शहरात मटणाच्या व्यापारास मोठा वाव आहे तसेच हा व्यापार परंपरागत पध्दतीने चालतो. शहरातील नागरिकांना आरोग्यदायी स्वच्छ मटण पुरवठा करणे हा अभ्यासाचा हेतू आहे. हा अभ्यास सल्लागारामार्फत व कृषी विकास व्यापार सुविधा केंद्र तसेच पशुसंवर्धन खाते यांचेमार्फत करण्यात येणार आहे. या अभ्यासात मटण व्यवसायातील सर्व घटकांचा अभ्यास, बाजार, कत्तलखाने, किरकोळ विक्रेते व जैविक विल्हेवाट आणि ग्राहकांचे हित यांचा समावेश आहे. या अभ्यासाच्या निकषावर जागतिक मानांकन दर्जाचा कत्तलखाना उभारणे, मटण व्यवसायासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणे, मटण वाहतुकीची आधुनिक व्यवस्था व विक्रीसाठीची मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे. हा अहवाल शासनाला सादर करणे अभिप्रेत आहे.

**बीड व यवतमाळ जिल्ह्यातून शेळी पालन एक उच्च मूल्यवर्धित व्यवसाय यांचे प्रात्यक्षिके राबविणे :-**

- विदर्भातील यवतमाळ व मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातून घटकाची अंमलबजावणी करण्यात येईल. प्रति जिल्हा २५० प्रात्यक्षिके घेण्यात येईल. लाभार्थ्यांची निवड, प्रशिक्षण व भेटी तसेच तांत्रिक मार्गदर्शन सेवादाते/पशुसंवर्धन खाते व आत्मा यांचेमार्फत करण्यात येईल. प्रात्यक्षिक धारकांच्या निवडीसाठी त्यांचेकडे २० ठाणबंद शेळ्या व ०.५० ते २.०० एकर बागायत जमीन असणे गरजेचे आहे. तसेच त्यांची क्षमता बांधणी सेवादातेमार्फत करण्यात येईल. प्रात्यक्षिक धारकांना १०० टक्के अनुदानावर हिरव्या चाऱ्याचे बियाणे व खतांचा पुरवठा करण्यात येईल तसेच प्रात्यक्षिक धारकांना ५० टक्के अनुदानावर पैदासीचा बोकड व चाराकटाई यंत्राचा पुरवठा करण्यात येईल. प्रात्यक्षिकांच्या भेटीसाठी जिल्ह्यामधून ३८० शेतकरी व नजीकच्या जिल्ह्यातून ३७० शेतकऱ्यांच्या भेटी सेवादात्यामार्फत आयोजित करण्यात येणार आहेत.

**जनावरांचे आरोग्य तपासणी शिबीरे :-**

- घटकांची अंमलबजावणी प्रकल्पातील मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जनावरांचे ४ बाजाराच्या लाभक्षेत्रातून होणार आहे. प्रतिवर्ष २ शिबीरे सहा महिन्याच्या अंतराने आयोजित करण्यात येतील व ते महाराष्ट्र शासनाच्या कामधेनू दत्तक ग्राम योजनेवर आधारीत आहे. लाभ क्षेत्रातील किमान ३०० ते ५०० पैदासक्षम जनावरे व शेळ्या/मेंढ्या असणाऱ्या गावातून ग्राम संमतीने शिबीरांचे आयोजन करण्यात येईल. प्रतिवर्षी ४८ शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबीरात तज्ज्ञ पशुवैद्यकांमार्फत जनावरांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये वंध्यत्व उपचार, गोचिड गोमाशांचे निर्मूलन, कृत्रिम रेतने, जंतनाशके या सेवा पुरविण्यात येणार आहेत. प्रकल्प कालावधीत एकूण २८८ जनावरांच्या आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

**पशुसंवर्धन विपणन व माहिती कक्षाची स्थापना करणे :-**

- पशुसंवर्धन विभागात माहिती कक्षाची स्थापना करणे. कक्षाची उभारणी व कार्यान्वयन सल्लागारामार्फत करण्यात येईल. कक्षाच्या संरचनेत आयुक्त पशुसंवर्धन हे अध्यक्ष राहतील व पशुधन बाजार व्यवस्थापन तज्ज्ञ, संगणक तज्ज्ञ तसेच मानव संसाधन व विकास तज्ज्ञ तसेच खात्याअंतर्गत अधिकाऱ्याचा समावेश असेल. पशुसंवर्धन विपणनविषयक व पशुसंवर्धन व्यवस्थापना विषयीचे वैध माहिती वैधस्थळ असेल. पशुधन व पशुजन्य पदार्थाच्या बाजारभावाविषयी माहितीची देवाण-घेवाण करणे. पशुजन्य पदार्थाच्या ि-नर्यातीसाठी लागणारी माहिती देणे, उद्योजक शेतकरी यांना उद्योग सुरू करण्याविषयीची माहिती देणे. खात्याअंतर्गत अधिकारी तसेच शेतकरी उद्योजक यांना विपणना विषयक प्रशिक्षण देणे. प्रकल्प कालावधीनंतर माहिती कक्षाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा सशुल्क असल्यामुळे प्रकल्पानंतर माहिती कक्ष आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होईल.

**पुणे येथील राज्यस्तरीय पशुसंवर्धन प्रशिक्षण संस्थेचे बळकटीकरण करणे :-**

- संस्थेच्या बळकटीकरणासाठी व प्रशिक्षण सुविधा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. प्रकल्प कालावधीत मोठ्या जनावरांचे २० बाजार व लहान जनावरांचे ४ बाजाराच्या लाभक्षेत्रातील ५०० पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी पाच दिवसांचा असून त्यात बाजारांचे व्यवस्थापन, जनावरांच्या रोग निर्मुलनाचे व्यवस्थापन इत्यादी विषयांचा समावेश असेल. प्राचार्य राज्यस्तरीय पशुसंवर्धन प्रशिक्षण संस्था या योजनेची अंमलबजावणी करतील. या घटकाअंतर्गत मिळालेला निधी प्रशिक्षण सुविधांचे बळकटीकरण करणे, प्रशिक्षण व प्रशिक्षण साहित्य खरेदी करणे यासाठी खर्च करणे प्रस्तावित आहे.

♦♦♦